नि.फौ.ख.क्र. ७७/२०१८
(नि. ५०)

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नांव– जयवंत बाबूराव राय
वय –५८ वर्षे, व्यवसाय – दुकान व्यवसाय
रा.आरवली, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही.व्ही.ठाकूर यांच्यामार्फत सुरु–</u>**

सन २०१३ पासून मी श्रीदेव वेतोबा देवस्थान कमिटी, आरवलीचा विश्वस्त म्हणून काम करतो. सन २००५ साली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग सावंतवाडी यांनी ग्रामपंचायत आरवली येथे पे अॅण्ड यूज टॉयलेट या तत्त्वावर शासन निधीमधून शौचालय बांधले होते. त्यामध्ये स्त्री व पुरुष यांच्यासाठी वेगवेगळे बाथरुम, मुताऱ्या व संडास होते. सदरचे बांधकाम हे सन २००५ साली पूर्ण करण्यात आले. शौचालयाच्या इमारतीचा ताबा ग्रामपंचायत आरवली यांनी घेतला नसल्यामुळे तो महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग सावंतवाडी यांच्याकडे होता. आरोपी यांनी शौचालयाच्या इमारतीचा दर्शनी भाग जे.सी.बी.च्या सहाय्याने तोडला. सदर घटनेच्यावेळी तेथे गणेश रेगे, बाबूराव आरोलकर, सुभाष कांबळी, यशवंत काबळी, बाळकृष्ण येसजी, अनंत कुडव, सुभाष पेडणेकर हे लोक उपस्थित होते. सदरचा जे.सी.बी. हा अण्णा झांटये व विजय नाईक यांच्या मालकीचा असून तो आरोपींनी बोलाविला होता. सदर घटना मी प्रत्यक्ष पाहिली होती. आरोपी व्यतिरिक्त तेथे आरवली गावचे पोलीस पाटील, उपसरपंच हजर होते. शौचालयाच्या इमारतीचा दर्शनी भाग आरोपींनी जे.सी.बी.च्या सहाय्याने तोडल्यानंतर आरवली गावचे पोलीस पाटील यांनी आरवली ग्रामपंचायत येथे तक्रार नोंदविण्याचा प्रयत्न केला. परंतु, तेथे ती नोंदवून घेण्यात आली नाही. त्यानंतर आरवली गावचे पोलीस पाटील यांनी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडे तक्रार नोंदविली. सदर कार्यालयाकडून देखील दखल न घेतल्यामुळे पोलीस पाटील यांनी लोकायुक्त मुंबई यांच्याकडे तक्रार नोंदविली. लोकायुक्त मुंबई यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग सावंतवाडी यांना आरोपींविरुध्द गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग सावंतवाडी यांच्या अधिकाऱ्यांनी आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल केले. कथीत घटनेबाबत माझ्याकडे पोलीसांनी चौकशी केली. मी घडलेली हकिगत सांगितली. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आज न्यायालयात आरोपी नामे बाळकृष्ण येसजी हजर नाहीत. उर्वरित सर्व आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहेत. आरोपी क्र. १ गणेश रेगे हा मयत आहे.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**आरोपी क्र. २, ४ ते ७ हजर. आरोपींचे विधीज्ञ श्री.एस.एन.भणगे वारंवार पुकारता गैरहजर. तहकूबीचा अर्ज अभिलेखावर दाखल. उलटतपासासाठी आरोपींना एक संधी देण्यात येते. सबब, साक्षीदाराचा आरोपींतर्फे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

सही/–

दिनांक– ११/०७/२०२३.

(के.के.पाटील)

न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.